Prepp
Your Personal Exams Guide

# R/P/P/S/II/2022

प्रश्न-पुस्तिका क्र.
Question Booklet No.

**919000029**

SET **A**

विषय-मराठी
Subject-MARATHI
द्वितीय प्रश्न-पत्र ( ऐच्छिक )
Paper II (Optional)
विषय कोड-19
Subject-Code-19

अनुक्रमांक
Roll No.

परीक्षार्थी अपना अनुक्रमांक दिए गए खानों में लिखें।
Candidate should write his/her Roll No. in the given boxes

मुद्रित पृष्ठों की संख्या/No. of Printed Pages : 15
समय/Time : 2 घण्टे/Hours

कुल प्रश्नों की संख्या/Total No. of Questions : 100
पूर्णांक/Total Marks : 200

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. राज्य पात्रता परीक्षा में दो प्रश्न-पत्र हैं । प्रथम प्रश्न-पत्र ( अनिवार्य प्रश्न-पत्र )-सामान्य प्रश्न-पत्र शिक्षण एवं शोध अभिवृत्ति का है । द्वितीय प्रश्न-पत्र परीक्षार्थी द्वारा चयनित विषय का है । दोनों प्रश्न-पत्रों के लिए एक ही संयुक्त ओ.एम.आर. शीट है । परीक्षार्थी को 1 बजे द्वितीय प्रश्न-पत्र ( ऐच्छिक विषय ) का दिया जायेगा । परीक्षार्थी को ओ.एम.आर. शीट के द्वितीय प्रश्न-पत्र के भाग में उनके द्वारा लिये गये ऐच्छिक विषय के कोड को अंकित करना है व प्रश्न पुस्तिका का सेट अंकित करना है । द्वितीय प्रश्न-पत्र की बुकलेट का नम्बर आवश्यक प्रविष्टियों में अंकित करना है । परीक्षार्थी 1:05 पर द्वितीय प्रश्न-पत्र की सील खोलकर उत्तर अंकित करना शुरू करेंगे । द्वितीय प्रश्न-पत्र ( ऐच्छिक विषय ) के 100 प्रश्न हैं जिनका क्रम 51 से 150 है । संयुक्त ओ.एम.आर. में परीक्षार्थी द्वितीय प्रश्न-पत्र वाले भाग में द्वितीय प्रश्न-पत्र के उत्तर अंकित करे । गलत क्रम में उत्तर अंकित करने के लिए परीक्षार्थी स्वयं जिम्मेदार रहेगा ।
2. सभी प्रश्न अनिवार्य हैं ।
3. सभी प्रश्नों के अंक समान हैं । प्रत्येक सही उत्तर के लिए 2 अंक प्रदान किये जायेंगे । ऋणात्मक मूल्यांकन का प्रावधान नहीं है ।
4. प्रश्न-पुस्तिका के आवरण पृष्ठ पर प्रश्न-पुस्तिका में लगे पृष्ठों की संख्या अंकित है । परीक्षार्थी आश्वस्त हो ले कि उसकी प्रश्न-पुस्तिका में निर्धारित संख्या में पृष्ठ लगे हैं, अन्यथा वह दूसरी प्रश्न-पुस्तिका माँग ले ।
5. प्रदत्त उत्तर-पत्र ( ओ.एम.आर. शीट ) पर दिए गए निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें तथा अपने उत्तर तदनुसार अंकित करें ।
6. कृपया उत्तर-पत्र ( ओ.एम.आर. शीट ) पर निर्धारित स्थानों पर आवश्यक प्रविष्टियाँ करें, अन्य स्थानों पर नहीं ।
7. परीक्षार्थी सभी रफ़ कार्य प्रश्न-पुस्तिका के निर्धारित स्थान पर ही करें, अन्यत्र कहीं नहीं तथा उत्तर-पत्र ( ओ.एम.आर. शीट ) पर भी नहीं ।
8. किसी प्रकार का केल्कुलेटर, लॉग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।
9. 3:05 बजे परीक्षा समाप्त होने के समय ओ.एम.आर. शीट वीक्षक को सौंपने के पश्चात् ही परीक्षार्थी कक्ष छोड़ेंगे ।

## INSTRUCTIONS TO THE CANDIDATES

1. There are two papers in the State Eligibility Test. The first question paper (compulsory question paper) is General Paper on Teaching and Research Aptitude. The second question paper is the subject selected by the examinee. Only one combined OMR sheet will be provided for both the question papers. The Second paper of optional subject will be given to the examinee at 1 p.m. The code of the second question paper subject selected by the examinee should be marked in the OMR Sheet. The booklet number of the second question paper has to be marked in the necessary entries. The examinee can start second question paper at 1:05 p.m. There are 100 questions in the second question paper (optional subject). The sequence of these questions is 51 to 150. In a combined O.M.R. Sheet, the examinee should mark the answers of the second question paper in the part of Second Question Paper. The examinee himself will be responsible for marking the answer in the wrong order.
2. All questions are compulsory.
3. All questions carry equal marks. 2 marks will be given for each correct answer. There is no provisions for Negative Marking.
4. On the cover page the number of pages is indicated in the Question Booklet. The examinee should verify that the requisite number of pages are attached in the Question Booklet, otherwise he/she should ask for another Question Booklet.
5. Read carefully the instructions given on the Answer Sheet (OMR Sheet) supplied and indicate your answers accordingly.
6. Kindly make necessary entries on the Answer Sheet (OMR Sheet) only at the places indicated and nowhere else.
7. Examinee should do all rough work on the spaces meant for rough work in the pages given in the Question Booklet and nowhere else, not even on the Answer Sheet (OMR Sheet).
8. Use of any type of calculator, log table etc. is prohibited.
9. Examinees will leave the Examination Hall only after handing over the OMR Sheet to the Invigilator at the end of the examination at 3:05 p.m.

SEAL

Prepp
Your Personal Exams Guide

रफ़ कार्य के लिए जगह

(SPACE FOR ROUGH WORK)

Prepp Your Personal Exam Guide

Prepp
Your Personal Exams Guide

51. भाषेच्या स्वरूपासंबंधी केलेल्या विधानांपैकी चुकीचे विधान शोधा :

(A) भाषेचे स्वरूप गुंतागुंतीचे असते

(B) मानवी भाषेत ध्वनी सुटे-सुटे वापरले जातात

(C) ध्वनीरचना सानुक्रम असतात

(D) ध्वनींचे अर्थसंकेत परंपरेने तयार झालेले असतात

52. भाषा संपादनाच्या संदर्भात पुढीलपैकी योग्य पर्याय निवडा :

(A) माणसाच्या मेंदूत भाषा संपादन करण्याची क्षमता जन्मत: नसते

(B) भाषा संपादन प्रक्रियेत भाषा कानावर पडणे हे महत्त्वाचे असते

(C) भाषिक क्षमता ही मानव आणि प्राणी यांच्यात सारखीच असते

(D) मानवेतर प्राण्यांमध्येही भाषा संपादन करण्याची क्षमता असते

53. ध्वनी रचनांचे 'संकेतीकरण' आणि 'विसंकेतीकरण' हे पुढीलपैकी कोणत्या कृतीत महत्त्वपूर्ण ठरते ?

(A) भाषिक संज्ञापन

(B) भाषिक श्रवण

(C) ध्वनी उच्चारण

(D) गप्प राहणे

54. वर्णनात्मक भाषाविज्ञानाची उभारणी कोणत्या घटकाला केंद्रवर्ती मानून झालेली आहे ?

(A) क्रियापद

(B) विशेषण

(C) स्वनिम

(D) व्याकरण

55. भाषेचा कालक्रमिक अभ्यास कोणत्या पद्धतीत केला जातो ?

(A) संरचनात्मक अभ्यास पद्धती

(B) ऐतिहासिक अभ्यास पद्धती

(C) तौलनिक अभ्यास पद्धती

(D) वर्णनात्मक अभ्यास पद्धती

56. भौगोलिक किंवा सामाजिक कारणांमुळे निर्माण झालेल्या विविध भाषा-भेदांना सामावून घेणारी, त्या त्या समाजाची एकसंध भाषा म्हणजे :

(A) बोली

(B) प्रमाणभाषा

(C) पोटभाषा

(D) स्थानिक भेद

Prepp
Your Personal Exams Guide

57. शब्दांच्या आठ जातीपैकी 'अविकारी' शब्दजातींची संख्या किती आहे ?

(A) तीन

(B) सहा

(C) पाच

(D) चार

58. खालीलपैकी कोणत्या दोन विभक्तींमध्ये वापरले जाणारे प्रत्यय सारखेच असतात ?

(A) द्वितीया-चतुर्थी

(B) प्रथमा-द्वितीया

(C) पंचमा-सप्तमी

(D) प्रथमा-चतुर्थी

59. कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्त्यापाशीच थांबत असेल, तर ते..................असते.

(A) सकर्मक क्रियापद

(B) शक्य क्रियापद

(C) अकर्मक क्रियापद

(D) द्विकर्मक क्रियापद

60. 'भाषा संस्कृती थोर एकच महाराष्ट्रा, तुझी देख रे !'............या काव्यपंक्ती कोणत्या वृत्ताचे उदाहरण आहेत ?

(A) शार्दूलविक्रीडित

(B) मंदाक्रांता

(C) वसंततिलका

(D) अक्षरगणवृत्त

61. प्रयोगरूप लोककलांपैकी कोणती लोककला लोकजीवनात रूजलेली आणि नाट्य सामर्थ्यांना स्वत:मध्ये सामावून घेणारी आहे ?

(A) बोहाडा

(B) कीर्तन-प्रवचन

(C) सोंगी भजनी भारूड

(D) तमाशा-लोकनाट्य

62. कोणत्या कालखंडातील विचारवंतांनी राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक स्थिती समजून घेणे व त्यावर उपाययोजना करण्यासाठी पाश्चात्य ज्ञानाची प्राप्ती करून घेणे ही उद्दीष्टे ठेवली ?

(A) यादव राजवटीच्या

(B) मोगल राजवटीच्या

(C) सातवाहन राजवटीच्या

(D) ब्रिटीश राजवटीच्या

63. देश पातळीवर भाषेच्या व वाङ्मयाच्या क्षेत्रात सर्व भाषांसाठी कार्य करणारी संस्था कोणती ?

(A) साहित्य अकादमी

(B) कला अकादमी

(C) गोवा अकादमी

(D) साहित्य महामंडळ

Prepp
Your Personal Exams Guide

64. स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांनी भाषा शुद्धीचे आंदोलन कोणत्या वर्षी सुरू केले होते ?

(A) 1918

(B) 1922

(C) 1924

(D) 1927

65. भारताला मुद्रण कलेची ओळख करून देण्याचे श्रेय कोणाकडे जाते ?

(A) इंग्रजांकडे (B) फ्रेंचांकडे

(C) डचांकडे (D) पोर्तुगिजांकडे

66. कोणाच्या प्रेरणेने 11 मे 1878 रोजी पहिले मराठी साहित्यसंमेलन पुण्यात झाले ?

(A) विष्णुशास्त्री चिपळूणकर व बाळशास्त्री जांभेकर

(B) लोकमान्य टिळक व गोपाळकृष्ण गोखले

(C) न्यायमूर्ती रानडे व लोकहितवादी

(D) विष्णुशास्त्री पंडित व भाऊ महाजन

67. 'संत साहित्य हे एक प्रकारे विद्रोही साहित्य आहे. कर्मकांड आणि विषमता यांनी ग्रासलेल्या जडमूढ धर्मजीवनाला धक्का देणारे साहित्य आहे.'

(A) या विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे

(B) या विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे

(C) सम्पूर्ण विधान बरोबर आहे

(D) सम्पूर्ण विधान चूक आहे

68. कथानक, नेपथ्य, वेशभूषा, प्रकाश योजना इत्यादी रंगमंचीय व्यापाराच्या बंधनातून मुक्त होऊनही नाट्यप्रकाराचा आत्मा टिकवून धरणारा नाट्यप्रकार कोणता ?

(A) एकांकिका (B) पथनाट्य

(C) लोकनाट्य (D) प्रहसन

69. 'फजिती' हा शब्द मराठीत कोणत्या भाषेतून आला ?

(A) गुजराती (B) फारसी

(C) हिंदी (D) कन्नड

70. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमुळे बेभान झालेला मराठी कामगार आणि गावाकडे राहिलेल्या मैनेसारखी बेळगाव, वगरवार, निपाणी व गोव्यातील जनता यांचे प्रखरपणे चित्रण आपल्या साहित्यातून कोणी केले ?

(A) शाहीर अमर शेख

(B) शाहीर विठ्ठल उमप

(C) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे

(D) शाहीर लहरी हैदर

Prepp
Your Personal Exams Guide

71. भारतीय साहित्यासंदर्भात प्राच्यविद्याविशारदांमध्ये खालीलपैकी कोणता गैरसमज रूढ होता ?

(A) भारतीय साहित्य हे केवळ तत्त्वचिंतनात्मक किंवा धार्मिक स्वरूपाचे असते

(B) भारतीय साहित्य केवळ राजकिय स्वरूपाचे असते

(C) भारतीय साहित्य केवळ भावनिक स्वरूपाचे असते

(D) भारतीय साहित्य केवळ सामाजिक स्वरूपाचे असते

72. काका कालेलकरांनी मराठी व गुजराती भाषेबरोबरच आणखी कोणत्या भाषेत साहित्यलेखन केले ?

(A) कोकणी

(B) हिंदी

(C) मल्याळम्

(D) कन्नड

73. गोगोलकृत 'इन्स्पेक्टर जनरल' या नाटकाचा मराठी अवतार.................हा आहे.

(A) संशयकल्लोळ

(B) आंधळ्याची शाळा

(C) नटसम्राट

(D) अंमलदार

74. 'विश्वसाहित्य' संकल्पनेचा पुरस्कार सर्वप्रथम कोणी केला ?

(A) रवींद्रनाथ टागोर

(B) साने गुरुजी

(C) गटे

(D) सरोजिनी नायडू

75. विविध भाषांमध्ये वाङ्मयीन आदानप्रदान व्हावे यासाठी रविंद्रनाथ टागोर यांनी कोणती संस्था स्थापन केली ?

(A) साहित्य अकादमी

(B) विश्वभारती

(C) आंतरभारती

(D) भारतीय विद्याभवन

76. साहित्यविश्वातील आदानप्रदानामध्ये खालीलपैकी कोणते कारण महत्त्वपूर्ण असते ?

(A) प्रभावशिलता (B) दुबळेपणा

(C) परधार्जिणेपणा (D) न्यूनगंड

77. 'एखाद्या साहित्यकृतीने दुसऱ्या साहित्यकृतीला जन्म दिला ही कल्पना नितांत त्याज्य आहे' हे विधान कोणाचे आहे ?

(A) हैरी रेडनर

(B) जॉर्ज ल्युकाच

(C) रेमाक हेन्री एच.

(D) रेने वेलेक

78. ज्या भाषेमध्ये संहिता भाषांतरित करावयाची ती भाषा म्हणजे.........................भाषा होय.

(A) अभिजात (B) मातृ

(C) लक्ष्य (D) मूळ

79. हिंदीतून मराठीत भाषांतरित झालेल्या कादंबऱ्यांच्या योग्य जोड्या जुळवा :

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| (a) मैला आँचल | (i) आपुले आपणाशी अनोळखी |
| (b) अपने–अपने अजनबी | (ii) शेवटचा डाव |
| (c) हसिन धोखा | (iii) काळी माती हिरवी नाती |
| (d) आखिरी दाँव | (iv) मृगजळ |
| | (v) अन्तिम खेळ |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (iv) | (v) | (ii) |
| (B) | (iv) | (i) | (iii) | (v) |
| (C) | (i) | (iii) | (iv) | (v) |
| (D) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

80. 'साधर्म्य आणि वैधर्म्य', 'उद्‌गम आणि प्रभाव' या चार अंगांनी घेतलेला शोध म्हणजे तौलनिक साहित्य होय'–ही व्याख्या कुणाची आहे ?

(A) वसंत बापट

(B) भालचंद्र नेमाडे

(C) निशिकांत मिरजकर

(D) आनंद पाटील

81. लौकिक पुराण परंपरेलाच 'Folklore' अशी संज्ञा देण्याचे श्रेय कोणाला दिले जाते ?

(A) जोनास बॅलिस

(B) मारियस नार्डो

(C) विलियम जॉन थॉम्स

(D) दुर्गा भागवत

82. 'ओल्ड डेक्कन डेज' या आपल्या ग्रंथात दक्षिण भारतातील विविध लोककथांचा समावेश करून लोककथांच्या संकलनाची पायाभरणी करण्याचे श्रेय कोणाला दिले जाते ?

(A) आर.ई. एन्थोवेन

(B) मेरी फ्रियर

(C) दत्तो वामन पोतदार

(D) आर्यन क्रॉफर्ड

Prepp
Your Personal Exams Guide

83. 'वैचारिक क्रांतीशिवाय समाजक्रांती संभवनीय नाही', डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे सूत्र पुढीलपैकी कोणत्या पत्रातील त्यांच्या अग्रलेखातून स्पष्ट होते ?

(A) प्रबोधिनी

(B) अस्मितादर्श

(C) मूकनायक

(D) समुचित

84. 'हे बांध रूढींचे फोडू या. भूत जातीयतेचे गाडू या.' आत्मजागृतीचा हा विचार कोणी दिला आहे ?

(A) रावजी सावळाराम गडकरी

(B) वामन कर्डक

(C) यशवंत मनोहर

(D) राजानंद गडपायले

85. पुढीलपैकी शंकरराव खरात यांचा कोणता कथासंग्रह **नाही** ?

(A) सांगावा

(B) तडीपार

(C) टिटवीचा फेरा

(D) मरण स्वस्त होत आहे

86. बाबूराव बागूल यांची 'सामाजिक प्रदूषण आणि शोषण' या विरुद्ध बंड करणारी कादंबरी कोणती ?

(A) अघोरी

(B) सूड

(C) कोंडी

(D) पाषाण

87. 'सोमवंशीय मित्र' नावाचे पहिले 'मासिक पुस्तक' काढण्याचे श्रेय कोणाला दिले जाते ?

(A) किसन फागू बनसोडे

(B) गंगाधर पानतावणे

(C) यशवंत मनोहर

(D) शिवराम जानबा कांबले

88. 'कथा अकलेच्या कांद्याची' हे प्रसिद्ध वगनाट्य कोणी लिहिले आहे ?

(A) शंकर पाटील

(B) बी. रघुनाथ

(C) व्यंकटेश माडगूळकर

(D) वसंत सबनीस

89. मावळ प्रदेशातल्या धोंडी हवालदाराची कथा सांगणाऱ्या 'पवनाकाठचा धोंडी' या कादंबरीचे लेखक कोण आहेत ?

(A) श्री. ना. पेंडसे

(B) बा. भ. बोरकर

(C) र. बा. मंचरकर

(D) गो. नि. दांडेकर

90. 'अंधारबन' या ग्रामीण कथा संग्रहाचे लेखक कोण आहेत ?

(A) भास्कर चंदनशिव

(B) आनंद यादव

(C) नागनाथ कोत्तापल्ले

(D) सदानंद देशमुख

Prepp
Your Personal Exams Guide

91. गतकाळातील आपली मूल्यप्राप्ती जोपासण्यासाठी वाङ्मयेतिहासाचा इतिहास तपासणे आवश्यक ठरेल. असे कोणी म्हटले आहे ?

(A) शं. गो. तुळपुळे

(B) गणेश देवी

(C) ह. श्री. शेणोलीकर

(D) द. दि. पुंडे

92. ''संतचरित्रकार जेव्हा जेव्हा काही विधाने करतात तेव्हा तेव्हा ती विधाने नसून तो एक परंपरेचा निर्देश असतो.'' असे कोणत्या अभ्यासकाने म्हटले आहे ?

(A) प्र. न. जोशी

(B) स. ग. मालसे

(C) अ. ना. देशपांडे

(D) म. रा. जोशी

93. राजमठ म्हणजे नृसिंहमंदिर, ही महानुभावांची पारंपारिक धारणा नुसती नोंदविण्यापलिकडे त्यांनी या संज्ञेकडे गांभीर्याने पाहिलेले दिसत नाही····· यांनी या संज्ञेचा अर्थ 'गावातील मुख्य, प्रमुख देऊळ' असा केला आहे.

(A) वि. भि. कोलते

(B) रा. चिं. ढेरे

(C) शं. गो. तुळपुळे

(D) अविनाश आवलगावकर

94. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानातील मुख्य सिद्धांत········ आहे.

(A) द्वैतीमतांचा

(B) शाक्तपंथाचा

(C) समन्वयवादी

(D) अद्वैताचा

95. महानुभाव प्रपंचास अनित्य मानतात. कारण प्रपंच व कार्यप्रपंच असे त्यांनी प्रपंचाचे··········भाग केले आहेत.

(A) दोन

(B) चार

(C) पाच

(D) तीन

96. मिथक आणि नाटक यांचे अतूट नाते आहे. मिथकातूनच नाटक उदयाला आले आहे. आणि ············झाले आहे.

(A) विस्तारीत

(B) निर्माणही

(C) उत्क्रांतही

(D) संचितही

97. ''केवळ अभिनय, दिग्दर्शन, नेपथ्य, ध्वनी व प्रकाशयोजना यांचे शब्दांविना संकलन म्हणजेही ··············नव्हे. कारण त्याचे नाटकपणच मुळी व्यक्तीच्या जिवंत वावरात असते.

(A) कादंबरी

(B) कथा

(C) संघर्ष

(D) नाटक

Prepp
Your Personal Exams Guide

98. "वाङ्मयेतिहास ही ग्रंथ व ग्रंथकारांची कालानुक्रमे केलेली जंत्री नसते किंवा तो वाङ्मयकोशही नसतो. गतकाळापासून आजपर्यंत निर्माण झालेल्या वाङ्मयीन परंपरांचा, त्याच्या स्वरूपाचा शोध घेण्याचा तो प्रयत्न असतो." असे वाङ्मयेतिहाससंदर्भात मत कोणी मांडले आहे ?

(A) ल. रा. नसिराबादकर

(B) अ. ना. देशपांडे

(C) ल. रा. पांगारकर

(D) गं. बा. सरदार

99. लोकांच्या भावना, लोकांच्या शब्दात, लोकांसाठी मांडणारे शाहीर कोण ?

(A) पंडित कवी

(B) लोककवी

(C) संतकवी

(D) वरीलपैकी नाही

100. 'परमार्थ करणाऱ्याने प्रपंचत्याग करावा. प्रपंच व परमार्थ या दोन्ही तलवारी एका म्यानात राहणे शक्य नाही." हे विधान कोणत्या संताने मांडले आहे ?

(A) समर्थ रामदास

(B) संत तुकाराम

(C) संत एकनाथ

(D) संत नामदेव

101. ग्रामीण साहित्य चळवळीचे पहिले साहित्य संमेलन हे 1977 साली.................येथे भरले होते.

(A) कोल्हापूर

(B) पुणे

(C) सांगली

(D) सातारा

102. ग्रामीण साहित्य चळवळीचे बिजारोपण कोणी केले ?

(A) आनंद यादव

(B) रा. रं. बोराडे

(C) शरद जोशी

(D) आनंद मांडगूळकर

103. दारिद्र्य, अस्पृश्यता, जातिसंस्था, वर्णव्यवस्था यांना नाकारण्याचे सामर्थ्य आणि तत्त्वज्ञान कोणत्या साहित्य चळवळीने मराठी साहित्याला दिले असावते असे तुम्हाला वाटते ?

(A) ग्रामीण साहित्य चळवळ

(B) आदिवासी साहित्य चळवळ

(C) दलित साहित्य चळवळ

(D) स्त्रीवादी साहित्य चळवळ

Prepp
Your Personal Exams Guide

104. "कुणाची वाङ्‌मयीन मक्तेदारी संपविण्याच्या दृष्ट इराद्याने आदिवासी साहित्याची चळवळ जन्माला आलेली नाही किंवा कुणाच्या मूल्यांचा ऱ्हासउत्सव साजरा करणे तिचा इरादा नाही." वरील विधान कोणत्या अभ्यासकाने मांडला आहे ?

(A) केशव मेश्राम
(B) भुजंग मेश्राम
(C) नजुबाई गावित
(D) डॉ. विनायक तुमराम

105. ..................यांनी श्रीशैल पर्वत आणि स्त्रीराज्य असलेले कदलिबन हे एकच असल्याचे सिद्ध करून दक्षिणेतील श्रीशैल पर्वत ही नाथसंप्रदायाची उदयभूमी म्हणून साधार सिद्ध केले आहे.

(A) म. रा. जोशी
(B) प्र. न. जोशी
(C) ह. श्री. शेणोलीकर
(D) रा. चिं. ढेरे

106. "महानुभावांचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म........ यांच्या काव्यांतून (वचनांतून) सिद्ध झालेले आहे." असे तुम्हाला वाटते ?

(A) म्हाईमभट
(B) नागदेवाचार्य
(C) चक्रधरस्वामी
(D) महदांइसा

107. ......................या ग्रामीण कथालेखकाच्या कथेतून महाराष्ट्र-कर्नाटक या सीमावर्ती प्रदेशातील घटिते, माणसे व परिसर यांचे चित्रण सदळपणे पहायला मिळते ?

(A) आनंद यादव
(B) रा. रं. बोराडे
(C) सदानंद देशमुख
(D) महादेव मोरे

108. इंग्रजी भाषेतील 'लिटल मॅगेझिन' या संज्ञेसाठी मराठीत..............हा पर्यायी संज्ञा म्हणून स्विकारली गेली.

(A) लघुनियतकालिके
(B) नियतकालिके
(C) मासिके
(D) पाक्षिक

109. "सौंदर्याभिरुची किंवा कलाभिरुचीचे विधान हे हेतुशून्य किंवा आस्थाशून्य असते." असे विधान कोणत्या पाश्चात्य अभ्यासकानी मांडले आहे ?

(A) तेन
(B) काण्ट
(C) ॲरिस्टॉटल
(D) प्लेटो

110. "संतकृपा झाली ।
इमारत फळां आली ॥
ज्ञानदेवे रचिला पाया ।
उभारिले देवालया ॥
नामा तयाचा किंकर ।
तेणे केला हा विस्तार ॥
जनार्दन एकनाथ ।
खांब दिला भागवत ॥"

वरील अभंग कोणत्या संतकवयित्रीचे आहे ?

(A) बहिणाबाई
(B) सोयराबाई
(C) मुक्ताबाई
(D) जनाबाई

Prepp
Your Personal Exams Guide

111. फ्रेंच लेखिका सिमॉन-द-बोव्हा यांनी कोणत्या ग्रंथातून स्त्रिवादी विचारांची मांडणी केलेली आहे ?
(A) द सेकंड सेक्स
(B) सेक्सचुअल पॉलिटिक्स
(C) थिंकिंग अबाउट वुमन
(D) अ लिटरेचर ऑफ देअर ओन

112. 'साहित्यप्रकार आणि साहित्यनिर्मिती यांच्या परस्पर संबंधाचा विचार करता, त्याच्या बुडाशी अनुभवातील आत्मनिष्ठा, वस्तुनिष्ठा आणि भाषामाध्यम ही तीनसूत्रे मूलत: साहित्यप्रकारांवर नियंत्रण ठेवू शकतात, असे दिसते'–हे विधान खालीलपैकी कोणाचे आहे ?
(A) केशव मेश्राम (B) आनंद यादव
(C) केशव वंसेकर (D) बाबाराव मुसळे

113. आदिवासी कवी व कवितासंग्रह यांच्या योग्य जोड्या लावा :

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| (a) | वाहरू सोनवाने | (i) | गोंडवन पेटले आहे |
| (b) | विनायक तुमराम | (ii) | मी नोडले तुरुंगाचे दार |
| (c) | माधव सरकुंडे | (iii) | गोधड |
| (d) | जयवंत वैनी | (iv) | अणंग |
| | | (v) | उलगुलान |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (i) | (iii) | (ii) | (v) |
| (B) | (iv) | (ii) | (i) | (v) |
| (C) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (D) | (ii) | (iii) | (v) | (iv) |

114. डॉ. सुभाष सावरकर खालीलपैकी कोणत्या साहित्य चळवळीशी संबंधीत आहेत ?
(A) महानगरीय साहित्य चळवळ
(B) आदिवासी साहित्य चळवळ
(C) स्त्रीवादी साहित्य चळवळ
(D) जनसाहित्य चळवळ

115. खालीलपैकी कोणती कादंबरी ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी नाही ?
(A) रुद्र (B) गोतावळा
(C) पाचोळा (D) धग

116. जैन साहित्याचा खालीलपैकी कोणता हेतू नाही ?
(A) धर्मप्रसार करणे
(B) वेदांचा प्रचार-प्रसार करणे
(C) परंपरागत ज्ञानाचे संरक्षण करणे
(D) समाजमनावर सुसंस्कार घडविणे

117. जैसी हरलंभाजि रत्नकिल ।
कि रत्नांभाजि हिरा निल ॥
तैसा भाषामाजि चोखल ।
भाषा मराठी ॥
असा मराठी भाषेचा गौरव कोणी केला ?
(A) रेने वेलेक
(B) रघुवेल लुकास
(C) फा. थॉमस स्टिफन्स
(D) डॉ. मॅकनिकल

118. "गाडी आली गाडी आली—झुक झुक झुक
शिट्टी कशी वाजे बधा कुक कुक कुक
इंजिनाचा धूर निघे भक भक भक
चाके पाहे तपासून ठक ठक ठक ।"

हे गीत कोणत्या काव्यप्रकारचे आहे ते ओळखा.

(A) भलरीगीत

(B) बालगीत

(C) पोवाडा

(D) अभंग

119. 'अभिजात मार्क्सवादाचा रोख समाजाच्या अर्थव्यवस्थेचा इतिहास आणि वर्गीय राजकारणाची तंत्रे हा होता, तर 'पाश्चात्य मार्क्सवाद' हा समाजाचे सांस्कृतिक अंग व विचारप्रणाली यांना प्राथमिक महत्त्व देणारा आहे—' हे विधान खालीलपैकी कोणाचे आहे ?

(A) डॉ. रमेश धोंडगे

(B) भालचंद्र नेमाडे

(C) गंगाधर गॉडगीळ

(D) डॉ. दिगंबर पाध्ये

120. (अ) नवसाहित्याच्या लेखनामुळे स्वातंत्र्योत्तर काळात 'प्रवाह' ची संकल्पना सर्वपरिचित झाली.

(ब) महायुद्धोत्तर समकालीन सामाजिक वास्तवाचा शोध नवसाहित्याने घेण्याचा प्रयत्न केला.

(A) वरीले दोन्ही विधाने बरोबर आहेत

(B) विधान (अ) बरोबर तर (ब) चूक आहे

(C) दोनों विधाने चूक आहेत

(D) विधान (अ) चूक तर (ब) बरोबर आहे

121. "ननु शब्दार्थो काव्यम्" अशी काव्याची व्याख्या कोणी केली आहे ?

(A) भामह

(B) रुद्रट

(C) मम्मट

(D) दण्डी

122. कवीच्या वैशिष्ट्यपूर्ण शब्दार्थ योजनेला 'प्रतिभासनिबंधन' असे कोणी म्हटले आहे ?

(A) जगन्नाथ

(B) वामन

(C) क्षेमेन्द्र

(D) राजशेखर

123. 'सांत्वन' आणि 'मानसिक विश्रांती' ही भरताला अभिप्रेत असणारी नाट्यप्रयोजने असल्याचे कोणी म्हटले आहे ?

(A) रा. श्री. जोग

(B) वसंत पाटणकर

(C) रा. भा. पाटणकर

(D) स. रा. गॉडगीळ

Prepp
Your Personal Exams Guide

124. पुढीलपैकी लक्षणेचे प्रकार कोणते ? योग्य पर्याय निवडा.

(i) गौणी सारोपा

(ii) अभिधामूलक

(iii) शुद्धा सारोपा

(iv) वस्तुध्वनी

(A) (i) आणि (iv)

(B) (i) आणि (iii)

(C) (ii) आणि (iv)

(D) (iii) आणि (iv)

125. भामहाचा वक्रोक्तिविचार म्हणजे 'रीतिविचार'च होय, असे कोणी म्हटले आहे ?

(A) स. रा. गाडगीळ

(B) पद्‌माकर दादेगावकर

(C) सुरेन्द्र बारलिंगे

(D) रा. श्री. जोग

126. 'वच्छहरण' हा काव्यग्रंथ कोणी लिहिला आहे ?

(A) नारायण व्यास

(B) भास्कर भट्ट

(C) विश्वनाथ व्यास

(D) दामोदर पंडित

127. 'विठो माझा लेकुरवाळा ।
संगे लेकुरांचा मेळा ॥'
हा प्रसिद्ध अभंग कोणाचा ?

(A) मुक्ताबाई

(B) सोयराबाई

(C) जनाबाई

(D) निर्मळा

128. 'श्रीसमर्थ प्रताप' या समर्थ रामदासांच्या चरित्र ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) गिरिधरस्वामी

(B) दिनकरस्वामी

(C) भीमस्वामी

(D) मेरुस्वामी

129. भारतातील पहिला सूफी प्रचारक कोण ?

(A) सईद बिन अबुल खैर

(B) निजामोद्दीन औलिया

(C) अलीउल हुजवेरी

(D) ख्वाजा मुहीनोद्दीन चिस्ती

130. 'श्रीशिव छत्रपतींची ९१–कलमी बखर' या बखरीचे लेखक कोण आहेत ?

(A) खंडोजी अनाजी मलकरे

(B) रघुनाथ यादव चित्रगुप्त

(C) दत्तो त्रिमल वाकेनिस

(D) कृष्णाजी अनंत सभासद

131. पहिला संगीत नाटककार म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो ?

(A) वि. ज. कितने

(B) गोविंद बल्लाल देवल

(C) गोपाळ गणेश आगरकर

(D) अण्णासाहेब किर्लोस्कर

132. वि. स. खांडेकर हे कोणत्या विचारप्रणालीचे लेखन करीत होते ?

(A) कलावादी

(B) जीवनवादी

(C) करमणूकवादी

(D) सुखात्मवादी

133. १८८१ मध्ये वि. का. ओक यांनी कोणत्या मासिकातून एक-एक छोटे चरित्र प्रसिद्ध केले ?

(A) सह्याद्री

(B) निबंधमाला

(C) बालबोध

(D) बळीराजा

134. सत्यकथन असावे अशी अपेक्षा कोणत्या वाङ्मयप्रकारात असते ?

(A) कथा

(B) कादंबरी

(C) नाटक

(D) आत्मचरित्र

135. 'अगिनदासाचा अफजलखानाच्या वधावरील पोवाडा' हा कोणत्या काळातील सर्वात जुना पोवाडा आहे ?

(A) शिवकाळ

(B) पेशवेकाळ

(C) ख्रिस्तकाळ

(D) निजामकाळ

136. "साहित्याच्या अभ्यासासाठी, विवरणासाठी आणि मूल्यांकनासाठी समीक्षेचा जन्म झाला." असे कोणी म्हटले ?

(A) प्रा. वा. ल. कुलकर्णी

(B) गो. म. कुलकर्णी

(C) प्रा. कुसुमावती देशपांडे

(D) प्रा. गंगाधर पाटील

137. "जीवनाच्या विविध प्रसंगातून आत्म्याचे वास्तव चित्रण म्हणजे चरित्र होय." ही चरित्राची व्याख्या कोणी केली आहे ?

(A) एडमंड ग्रॉस

(B) ड्रायडन

(C) जॉनसन

(D) कार्लाईल

Prepp
Your Personal Exams Guide

138. समाजशास्त्रीय समीक्षेची संकल्पना कोणत्या फ्रेंच समीक्षक व विचारवंत यांच्या संकल्पनेतून उदयास आली ?

(A) मारीओ

(B) सेन

(C) जिओ

(D) तेन

139. निबन्धमालाकार म्हणून कोणाला ओळखले जाते ?

(A) विष्णुशास्त्री चिपळूणकर

(B) गोपाल आगरकर

(C) वि. स. खांडेकर

(D) रा. भि. गुंजीकर

140. "जी हृदयाला चटका लावते, ती लावणी होय।" अशी लावणीची व्याख्या कोणी केली ?

(A) राम जोशी

(B) कोल्हटकर

(C) होणाजी बाळा

(D) शेवाळकर

141. 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीतील डॉक्टर मंडी हा कोणत्या देशाचा आहे ?

(A) अमेरिका

(B) जर्मनी

(C) लंडन

(D) जपान

142. "हे देव दानव जन्मांच शापित कडं भेइत मी आता जन्माला घालणार आहे माणूस" हा संवाद संजय पवारांच्या "कोण म्हणतं टक्का दिला ?" या नाटकातील कोणत्या पात्राचा आहे ?

(A) सुकन्या

(B) सुदर्शन

(C) देवयानी

(D) कचका

143. लक्ष्मीबाई टिळकांच्या शिक्षणाचा प्रारंभ कुठे झाला होता ?

(A) नागपूर

(B) इस्लामपूर

(C) मुंबई

(D) राजनांदगाव

144. "मासा पाणी खेळे गुरु कोण असे त्याचा" असे महात्मा फुले यांनी कोणत्या ग्रंथात म्हटले आहे ?

(A) सत्सार

(B) तृतीयरत्न

(C) शेतकऱ्याचा आसुड

(D) छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा

145. कोणत्या इंग्रज अधिकाऱ्याने १८६९ साली संत तुकारामांची अभंग गाथा प्रकाशित केली ?

(A) ग्रांट डफ

(B) कैप्टन कोगन

(C) सर अलेक्झांडर ग्रांट

(D) रॉबर्ट डलहौसी

146. "संवसार तापे तापलो मी देवा ।
करिता या सेवा कुटुंबाची ॥"
ही अभंग रचना कोणत्या संत कवीची आहे ?

(A) संत नामदेव

(B) संत तुकाराम

(C) संत सावतामाळी

(D) संत गोरा कुंभार

147. "भीती वांटने की एक दिवशी जरासा ताबा गेला तर डोळ्यांवाटे नुसत्या रक्ताच्या धाराच वाहातील गळ्यावाटे आतड्याच्या चिंध्या आणि काळजाचे चिरोदेध बाहेर पडतील ।" हा संवाद 'गिधाडे' या नाटकातील कोणत्या पात्राने उद्गारलेले आहे ?

(A) रजनीकांत

(B) रमा

(C) उमाकांत

(D) रमाकांत

148. 'आयदान' या आत्मचरित्राच्या शिर्षकाचा अर्थ काय आहे ?

(A) बांबूचे सुपं

(B) बांबूची दुरडी

(C) बांबूची चटई

(D) बांबूची परडी

149. मराठी साहित्यातील प्रथम दलित स्त्री आत्मचरित्र कोणते ?

(A) आयदान

(B) जिणं आमुचं

(C) अंतस्फोट

(D) मरणकळा

150. अंत जनाबाईंच्या अभंगांचे विषयपरत्वे कोणत्या वारकरी संताच्या अभंगरचनेशी साधर्म्य आहे ?

(A) संत ज्ञानेश्वर

(B) संत तुकाराम

(C) संत सावतामाळी

(D) संत नामदेव

Prepp
Your Personal Exams Guide

रफ़ कार्य के लिए जगह

(SPACE FOR ROUGH WORK)

Prepp Your Personal Exam Guide

रफ़ कार्य के लिए जगह

(SPACE FOR ROUGH WORK)

Prepp
Your Personal Exams Guide

रफ़ कार्य के लिए जगह

(SPACE FOR ROUGH WORK)

Prepp
Your Personal Exams Guide